दाखल दिनांक : ०९/०१/२०१८
नोंदणी दिनांक : १०/०१/२०१८
निकाल दिनांक : १८/०१/२०२१
कालावधी : ३ वर्षे ९ म.

**कडेगांव येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात कडेगांव येथे**

(CNR No. MHSN130000252018)

**नियमीत फौजदारी खटला क्र. ०१/२०१८**

**निशाणी क्रमांक : ५०**

महाराष्ट्र शासनतर्फे
म. पोलीस नाईक
चिंचणी वांगी पोलीस ठाणे,
तालुका कडेगांव, जिल्हा सांगली .. अभियोग

विरुध्द

१. वैभव तानाजी गवंडी
वय वर्षे ३३, धंदा – शेती

२. सौ. वैशाली वैभव गवंडी
वय वर्षे २५, धंदा – शेती

दोघे रा. तडसर, तालुका कडेगांव, जिल्हा सांगली .. आरोपी

---

अपराध – भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०४ सह ३४ प्रमाणे.

........................................................................................................

अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता : श्री. अमित सगरे
आरोपीतर्फे विधीज्ञ : श्री. के.आर. महाजन

........................................................................................................

## न्याय–निर्णय

(दिनांक १८/०१/२०२१ रोजी घोषित )

१. आरोपी क्र. १ व २ यांचेवर भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०४ सह ३४ प्रमाणे दोषारोप दाखल करणेत आलेले आहे.

२. सरकारपक्षाची केस थोडकयात पुढीलप्रमाणे –

ता. १८/११/२०१७ रोजी फिर्यादी श्वेता नितीन गवंडी ही गवंडयाचा मळा येथील गट क्र. १५७५ या जमिनीमध्ये काम करत होती. त्यावेळी तिचा चुलत दिर व त्याची पत्नी म्हणजेच आरोपी क्र. १ व २ हे त्यांच्या शेतातील घाण काढून सामाईक रस्त्यावर टाकत होते. फिर्यादी या त्यांना विचारणेस गेले असता तू कोण आम्हांस विचारणार आम्ही कोठेही कचरा टाकू असे म्हणाल्या. त्यानंतर आरोपी क्र. २ यांनी आम्हांला तुझ्या शेतातून दुसरा रस्ता पाहिजे असे म्हणून शिवीगाळ करणेस सुरवात केली. तिने झटापट करुन तिला खाली पाडले व उजव्या डोळयाच्या भुवईवर चावा घेतला. आरोपी क्र.१ याने पळत येवून त्याच्या हातातील खुरप्याने फिर्यादीच्या डाव्या मनगटावर दुखापत केली. फिर्यादीने आरडाओरडा केलेवर तिचे पती नितीन व त्यांची मैत्रीण शबाना शेख तिथे पळत आले व तिला सोडवले. फिर्यादी हिने त्यानंतर पोलीसस्टेशनला जावून फिर्याद नोंदवली. पोलीसांनी गुन्हयातील पंचनामा नोंदवून तपास चालू केला. तपास पूर्ण झालेवर त्यांनी आरोपी यांचेविरुध्द दोषारोपपत्र पाठवले.

३. आरोपींना दोषारोपपत्राच्या नकला पुरविणेत आल्या. आरोपी यांचेविरुध्द

नि.१९ वर दोषारोप नोंदविणेत आले. आरोपी यांनी गुन्हा कबूल नसलेचे सांगून त्यांचेविरुध्द केस चालविणेविषयी विनंती केली. आरोपी यांचेवतीने युक्तीवाद सादर करणेत आला की घटनास्थळावरील परिस्थिती ही संशयास्पद असून रस्त्याविषयी आरोपींची कोणतीही मागणी कधीही नव्हती. त्यामुळे दुसरा रस्ता मागणेचा विषयच उदभवला नव्हता. आरोपी यांचेविरुध्द असणारा वैदयकीय पुरावा पाहता तोंडी पुराव्याशी सुसंगत नसलेने त्यांना निर्दोष सोडणेविषयी विनंती करणेत आली.

४. विद्वान सरकारी वकील यांनी युक्तीवाद केला की आरोपी क्र.१ व २ यांनी संगनमत करुन फिर्यादी हिला मारहाण केली असलेचे सिध्द होत असलेने त्यांना शिक्षा करणेत यावी. आरोपी यांच्या विद्वान वकीलांनी युक्तीवाद सादर केला की सरकारपक्षाला उपलब्ध असणारे आवश्यक साक्षीदार तपासणेत आलेले नसून फिर्यादी यांच्या परीचयातील साक्षीदार तपासून सदरची केस दाखल करणेत आलेली आहे. तोंडी पुरावा व घटनास्थळावरील परिस्थिती व वैदयकीय पुरावा हे सुसंगत नसलेने आरोपी यांना निर्दोष सोडणेविषयी त्यांनी विनंती केली.

५. आरोपींविरुध्द असणारा पुरावा त्यांना वाचून दाखवला. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे त्यांचा जबाब नोंदवणेत आला.

६. विद्वान सरकारी वकील व आरोपींचे विद्वान वकील यांचा युक्तिवाद ऐकल्यावर पुढीलप्रमाणे गुण या केसच्या कामी काढण्यात येतात.

| अ.क्र. | गुण | उत्तर |
|---|---|---|
| १ | ता. १८/११/२०१७ रोजी फिर्यादी सामाईक रस्त्यावर कचरा टाकू नका म्हणून सांगणेस गेली असता आरोपी क्र. | नाही |

| | | |
|---|---|---|
| | १ व २ यांनी संगनमताने शिवीगाळ करुन तिच्याशी झटापट केली ही बाब सरकारपक्ष सिध्द करतो काय ? | |
| २ | आरोपी क्र. १ व २ यांनी संगनमत करुन फिर्यादी हिच्या भुवईला चावून व डाव्या हातावर खुरप्याने मारुन दुखापत केली ही बाब सरकारपक्ष सिध्द करतो काय ? | नाही |
| ३ | काय हुकूम? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

### गुण क्रमांक १

७. या केसच्या कामी सरकारपक्षातर्फे सा.क्र. १ म्हणून फिर्यादी श्वेता नितीन गवंडी हिला नि.२५ वर तपासणेत आलेले आहे. तिच्या पुराव्याद्वारे तिची फिर्याद नि.२६ पुराव्यात नोंदविणेत आली. सरकारपक्षाने त्यानंतर सा.क्र. २ सुनील मारुती पवार या पंच साक्षीदाराला सा.क्र. २ म्हणून नि. ३२ वर तपासले आहे. त्याच्या पुराव्याद्वारे पंचनामा नि.३५ पुराव्यात नोंदविणेत आला. सरकारपक्षाने त्यानंतर सा.क्र. ३ शबाना फिरोज शेख प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांना नि.३४ वर सा.क्र. ३ म्हणून तपासलेले आहे. फिर्यादी हिचा नवरा नितीन संभाजी गवंडी याला सा.क्र. ४ म्हणून नि.३७ वर तपासणेत आलेले आहे. तर सा.क्र. ५ म्हणून तपास अधिकारी मेघा त्रींबक इदाते यांनी आपली साक्ष नि.४१ वर नोंदवली आहे. वैदयकीय अधिकारी डॉ. पोर्णिमा आशुतोष ॠंगारपुरे यांना सा.क्र. ६ म्हणून नि. ४६ वर तपासणेत आलेले आहे. वैदयकीय अधिकारी यांनी अदा केलेला दाखला नि. ४७ वर पुराव्यात नोंदविणेत आलेला आहे. अशाप्रकारे सरकारपक्षाने आरोपी यांचेविरुध्द पुरावा सादर केलेला आहे.

८. या केसच्या कामी विद्वान सरकारी वकील यांनी युक्तीवाद सादर केला की फिर्यादी हिच्या पुराव्याच्या अनुषंगाने प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासणेत आलेले असून त्यांचा पुरावा सुसंगत असलेने आरोपींना शिक्षा करणेत यावी. आरोपी यांचे विद्वान वकील यांनी युक्तीवाद सादर केला की प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचा पुरावा विश्वासार्ह नसलेने आरोपींना निर्दोष सोडणेस विनंती केली.

९. या केसच्या कामी विद्वान सरकारी वकील व आरोपींचे विद्वान वकील यांचेवतीने सादर केलेला युक्तीवाद व उपलब्ध असणारा पुरावा जर पाहिला तर फिर्यादी हिच्या म्हणण्याप्रमाणे ती आरोपींना सामाईक रस्त्यावर घाण टाकू नका म्हणून सांगणेस गेली होती. फिर्यादी हिच्या पुराव्याप्रमाणे त्यावेळी आरोपीनी पळत येवून तिला झटापट करुन खाली पाडले व शिवीगाळ केली. फिर्यादी यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या अनुषंगाने जर या केसमधील पंचनामा पाहिला तर फिर्यादी आरोपींना सांगणेसाठी कुठे गेली होती हे स्पष्ट करत नाही. घटनास्थळाविषयीचे वर्णन जे नि.३३ च्या पंचनामात नमूद केलेले आहे ते फिर्यादीच्या तोंडी पुराव्याशी सुसंगत नाही. पंचनामाच्या अनुषंगाने तडसर कडेगांव रस्त्यालगत असणा–या शेतामध्ये सदरची घटना घडली. ते ठिकाण सरबांधापासून दहा फुट अंतरावरती दाखविणेत आलेले आहे. तर घटनास्थळावर पाच फुटाच्या अंतरावर खुरपे मिळालेचे वर्णन केलेले आहे. चतुःसिमादरम्यान दिलीप शंकर तोडकर यांची शेतजमिन ही पूर्वेस दाखविणेत आली असून पश्चिमेला फिर्यादीची शेतजमिन व त्या पलीकडे दिलीप महादेव पाटील यांची शेतजमिन, उत्तरेस फिर्यादीचे शाळू पिक असलेची शेतजमिन व दक्षिणेस आरोपी व फिर्यादी यांचे शेतजमिनीचा सरहदद बांध व त्या पलीकडे आरोपी वैभव तानाजी गवंडी यांची शेती. पंचनामातील वर्णनावरुन घटना ही सरबांधावरती झाली की शाळूच्या पिकात झाली या विषयीचा संभ्रम उत्पन्न

होतो. फिर्यादी सा.क्र. १ प्रत्यक्षदर्शी सा.क्र. ३ शबाना व फिर्यादीचे पती सा.क्र. ४ नितीन यांचा जर पुरावा पाहिलातर घटना ज्या क्रमात घडली त्याविषयी कोणताही सुसंगत पुरावा उपलब्ध होत नाही. फिर्यादीपासून काही अंतरावर शबाना काम करत असलेचे म्हटलेले आहे व त्यापासून लांब अंतरावर नितीन काम करत असलेचे म्हटलेले आहे. परंतू सा.क्र. ३ व ४ यांनी स्वतः भांडणाची सुरवात होताना शिवीगाळ करताना ऐकलेबददलचे व झटापट पाहिल्याबददलचे म्हटलेले आहे. सरकारपक्षाच्या केसप्रमाणे फिर्यादी ओरडल्यानंतर ते दोन साक्षीदार तिथे आलेची सरकारपक्षाची केस आहे. यावरुन निश्चितच दोन्ही साक्षीदार चुकीची व खोटी विधाने करत असलेचे स्पष्ट होते. स्वतः फिर्यादी जो घटनाक्रम सांगते त्याप्रमाणे पंचनामा किंवा सा.क्र. २ यांच्या पुराव्यावरुन घटनाक्रमामध्ये तथ्य आढळून येत नाही. त्यामुळे फिर्यादी ही आरोपींना घाण टाकू नका म्हणून सांगणेस गेली होती यावरुन चिडून जावून आरोपी क्र. २ हिने तिला शिवीगाळ करुन दुस–या रस्त्याची मागणी केली व झटापट केली असे म्हणता येवू शकत नाही. त्यामुळे गुण क्रमांक १ चे उत्तर नाही म्हणून देणेत येते.

**<u>गुण क्रमांक २</u>**

१०. सरकारपक्षाची केस अशी आहे की आरोपी क्र. २ हीने फिर्यादीशी झटापट केली व तिला खाली पाडले. आरोपी क्र. २ हिने त्यानंतर तिच्या उजव्या डोळयाच्या भुवईचा चावा घेतला. तर आरोपी क्र. १ याने खुरप्याने तिच्या डाव्या हातावर मारुन जखम केली. सरकारपक्षाच्या म्हणण्याप्रमाणे आरोपी क्र. १ याने वापरलेले खुरपे सा.क्र. २ यांच्या पुराव्याद्वारे पुराव्यात नोंदविणेत आलेले आहे. तर सा.क्र. ५ तपास अधिकारी यांच्या पुराव्याद्वारे सदरचा गुन्हा आरोपींनी ज्या परिस्थितीत केला ती पुराव्यात

नोंदविणेत आली आहे. आरोपी यांचे विद्वान वकील यांनी युक्तीवाद सादर केला की फिर्यादीच्या सांगणेप्रमाणे खुरप्याने मनगटाच्या वरील भागात एक घाव केला असलेचे म्हटले आहे. तर वैदयकीय अधिकारी यांच्या नि.४६ वरील पुरावा व नि.४७ वरील दाखला तर पाहिला तर त्याठिकाणी दोन जखमा असलेचे दिसून येते. बचावपक्षाच्यावतीने पुढे असा युक्तीवाद सादर करणेत आला की भुवईवर जिथे चावा घेतलेचा भाग म्हणून नमूद करणेत आलेला आहे त्यामध्ये कुठेही दाताचा व्रण दिसला नसलेचे वैदयकीय अधिकारी यांनी मान्य व कबूल केलेले आहे.

११. या केसच्या कामी प्राप्त असणारा पुरावा जर पाहिला तर वैदयकीय पुराव्याशी तो सुसंगत नसलेचे दिसून येते. फिर्यादीला खाली पाडलेवर आरोपी क्र. २ हिने भुवईचा चावा घेतलेचे म्हटलेले आहे. तर आरोपी क्र. १ याने जे खुरपे मारलेले आहे ते डाव्या हाताच्या आतील भागामध्ये आहे. जी जखम चावा घेतलेची म्हटलेली आहे ती वैदयकीयरीत्या चावल्यामुळे उदभवली आहे असा कोणताही विश्वासार्ह पुरावा उपलब्ध नाही. तर खुरपे मारुन जी जखम झालेली आहे तिचे स्वरुप जर पाहिले तर ती हाताच्या आतील बाजूला असलेचे दिसून येते. त्यामुळे ती घाव केलेने उदभवली आहे असे म्हणता येवू शकत नाही. सरकारपक्षाने जो पुरावा दिलेला आहे त्यावरुन हातावरची दुसरी जखम कशी उत्पन्न झाली याविषयीचे कोणतेही स्पष्टीकरण सरकारपक्षाच्या केसमध्ये आढळून येत नाही. त्यामुळे केसमधील पुरावा हा जखमांविषयी सुसंगत नसलेचे स्पष्टपणे दिसून येते. याशिवाय केसचे घटनास्थळ व सरकारपक्षाची केस जर पाहिलीतर त्यामध्ये ताळमेळ नसलेचे दिसून येते. फिर्यादीच्या म्हणण्याप्रमाणे ती कचरा टाकू नये म्हणून सांगणेसाठी गेलेली होती. तर घटनास्थळाप्रमाणे सरबांधापासून दहा फुटाच्या आत शाळूच्या पिकामध्ये घटना झालेचे पंचनामावरुन दिसते. केसमधील पंचनामा पाहिला तर

नि.३३ च्या पंचनामामध्ये शाळूच्या पिकाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेचे वर्णन दिसून येत नाही. त्यामुळे फिर्यादी सांगत असलेल्या गोष्टीमध्ये काही तथ्य आहे असे म्हणता येवू शकत नाही. त्यामुळे एकंदरीत केसमध्ये जे आरोप केलेले आहेत त्याप्रमाणे आरोपी क्र. २ हिने चावा घेवून दुखापत केली व आरोपी क्र. १ याने खुरप्याने मारुन जखम केली असे म्हणता येवू शकत नाही. त्यामुळे गुण क्रमांक २ चे उत्तर नाही म्हणून देणेत येते.

१२. सरकारपक्षाची केस अशी आहे की आरोपी क्र. १ व २ यांनी संगनमत करुन फिर्यादी हिला मारहाण केली. सरकारच्यावतीने जे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासणेत आले आहेत त्यांच्या पुराव्यावरुन जी गोष्ट त्यांच्या बघण्यात नव्हती त्याविषयीही त्यांनी आपल्या पुराव्यामध्ये वर्णन केले असलेचे दिसून येते. आरोपी यांचेविरुध्द ज्या पध्दतीने आरोप करणेत आलेले आहेत त्याअनुषंगाने वैदयकीय पुरावा व घटनास्थळावरील परिस्थिती आढळून येत नाही. त्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येतात.

## <u>आदेश</u>

१. आरोपी क्र. १ व २ यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) प्रमाणे भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०४ सह ३४ च्या दोषारोपातून दोषमुक्त करणेत येते.

२. आरोपी यानी पूर्वी दिलेला जामीन रदद करण्यात येतो.

३. मुददेमालातील खुरपे हे शेती उपयोगी हत्यार असलेने अपील कालावधीनंतर त्याचा लिलाव करुन त्याची रक्कम सरकारी खजीन्यात जमा करणेत

यावी.

४. आरोपी यानी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) नुसार नवीन ५,०००/– रुपये (रुपये पाच हजार मात्र) चा जामीन व जातमुचलका सादर करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला असे. )

Digitally signed by Vijay Ramchandra Gharal
Date: 2021.01.19 16:11:40 +05'30'

कडेगांव (वि. रा. घराळ )

दिनांक १८/०१/२०२१ न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कडेगांव

I affirm that the contents of this P.D.F file judgment are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : M.G. Buchade, (Grade III) |
| Court | : Civil Judge, Jr. Dn., & J.M.F.C., Kadegaon |
| Date | : 18/01/2021 |
| Order signed by the Presiding Officer on. | : 18/01/2021 |
| Order uploaded on | : 19/01/2021 |